# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

(नॅक समिती तर्फे "अ" दर्जा प्राप्त )

**शैक्षणिक विभाग** (०२४०)२४०३११८/२४०३११९
कुलसचिव (का.) २४०३३३४ (नि.)२४००२०३
फॅक्स :(०२४०) २४०३१२४, २४०३३३५
वि.का.अ. (का) (०२४०) २४०३२२४
Web Site-WWW.bamu.net
E-mail: bcud.office@bamu.ac.in

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद-४३१००४
(महाराष्ट्र)


संदर्भ : शैक्ष /संलग्न/२०१८/८३१

दिनांक ०५/०४/२०१८

**अति तात्काळ**

प्रति,
**प्राचार्य/प्राचार्या**
सर्व संलग्नित महाविद्यालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय :-** मा. सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपिल क्रं ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि. ०६ जुलै,२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत

**संदर्भ :-** सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे पत्र दि. ०२/०४/२०१८

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या कार्यालयाने संदर्भिय पत्रा नमूद केलेल्या माहिती संदर्भात त्वरीत संलग्नीकरण संकेतस्थळावर Login केल्यानंतर Massage board वरील Link वर जाऊन दिनांक ११-०४-२०१८ पुर्वी माहिती भरावी.

**सोबत :- संदर्भिय पत्र**

**प्र- कुलगुरू**

**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक, उच्चशिक्षण, औरंगाबाद विभाग,
( नविन इमारत ), देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद
Website :- www.jdheaur.org/ E-mail:- jdheaur_2007@rediffmail.com
फोन नंबर .२३३१९१३ एस.टी.डी.कोड ०२४० फॅक्स नंबर २३३१९१३

जा.क्र. शिससं/उशि/औवि/अनु-१-४/ २०१८/ १२८१ दिनांक :- २ /०४/२०१८

**महत्वाचे**

प्रति,

१. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.
२. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र, शा. शिक्षणशास्त्र महाविद्यालये, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

**विषय - मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.८९२८/२०१८ व इतर याचिका यामध्ये दि.६ जूलै २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा.शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.युएनआय/उशिसं/संकीर्ण/अपील क्र. ८९२८/२०१८/ विशी-१ ,/४०८३, दिनांक- ०२/०४/२०१८

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि. ६ जूलै २०१७ च्या सविस्तर निकालाव्दारे असा निर्णय दिला आहे की, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती अथवा इतर मागासवर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत/स्थानिक स्वराज्यसंस्था व राज्य अनुदानित खाजगी शैक्षणिक संस्था यामध्ये नियुक्त झालेले व त्यानंतर अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले अधिकारी व कर्मचारी यांची संख्या याबाबतची माहिती खालील प्रपत्रात सादर करण्यात यावी.सुलभ संदर्भासाठी संचालनालयाच्या पत्राची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे. सदरील माहिती आजच **ई-मेल व्दारे** सादर करावी.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | सन १९९५ ते २००३ या कालावधीत ST जमात प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त अधिकारी/कर्मचा-यांची संख्या | सन १९९५ ते २००३ या कालावधीत ST जमात प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त तथापी ST जमात प्रमाणपत्र अवैध ठरलेलेअधिकारी/कर्मचा-यांची संख्या | रकाना ४ मधीलअधिकारी/कर्मचारी यांची नावे व नियुक्ती वर्ष व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

RSDhamnaskar 02.04.18

(डॉ. आर. एस. धामणस्कर)
सहसंचालक, ( उच्चशिक्षण )
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

Acad Sec

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय,(उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमार,पुणे ४११००१**
**Web: www.dhepune.gov.in** **Mail Id: vishi.dhepune@nic.in**
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स०२०/२६११११५३

क्र. -युएनआय उशिसं /संकिर्ण /अपिल क्र ८९२८ /२०१८ / विशि- १ / 8063 दिनांक- 2 APR 2018

अतितात्काळ

प्रति,

१.कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
२. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय -** मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि.६जुलै,२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.

**संदर्भ -** शासनाचे पत्र क्र बीसीसी -२०१८/प्र.क्र.७२/१६- ब/ दिनांक २८/३/२०१८ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक -६ जुलै, २०१७ च्या सविस्तर निकालाव्दारे असा निर्णय दिला आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागासवर्ग या जातीना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तीना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर न करता सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचा-यांना निवृत्तीवेतन देय ठरणार नाही. मा सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा प्रस्ताव ७ दिवसात मंत्रिमंडळापुढे आणावा, असे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहेत. मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावयाच्या प्रस्तावात सन १९९५ ते २००३ या कालावधीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे राज्य शासनाच्या सेवेत, तसेच राज्याचे सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य अनुदानित खाजगी शैक्षणिक संस्था यामध्ये नियुक्त झालेले व त्यानंतर अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले अधिकारी व कर्मचारी यांची संख्या सादर करण्याबाबतचे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी दिले आहेत.

मा.मुख्यमंत्री यांनी दिलेले निर्देश विचारात घेता. सदर माहिती दोन दिवसात सामान्य प्रशासन विभागास सादर करावयाची असलेने **सदरहू आपल्या विद्यापीठाची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात आजच vishi.dhepune@nic.in या मेलव्दारे तात्काळ या संचालनालयास सादर करावी.**

(सोबत संदर्भिय पत्राची प्रत जोडली आहे.)

( सुप्रश दुसाने )
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य पुणे- १

RSD
02.04.18

| अ. | शासकीय कार्यालये/ विद्यापीठ/महाविद्यालयाचे नाव | सन १९९५ ते २००३ या कालावधीत S.T.जमात प्रमाणपत्राच्या आधारे 'नियुक्त अधिकारी /कर्मचारी संख्या | सन १९९५ ते २००३ या कालावधीत S.T.जमात प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त तथापी S.T. जमात प्रमाणपत्र अवैध ठरलेले अधिकारी / कर्मचारी संख्या | रकाना ४ मधील अधिकारी / कर्मचारी यांची नावे व नियुक्ती वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |